**ARTHA**
( Fortnightly )
**Poona 4**
Tel. 55627

# अर्थ

**LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT**
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार, २ आणि १६ ऑक्टोबर १९७४ | अंक १९ आणि २०


# चारा मुखी पिलांच्या..

आपल्या अपत्यांना कणाकणाने
दाणा भरविणारी चिमणी
माणसांनाही सहजपणे सुचवते.

आपल्यालाही आपल्या मुलांचे
भवितव्य नियमितपणे बचत करुन
सुरक्षित करता येईल.

ग्राहकांच्या गरजा लक्षांत घेऊन
आपल्या *महाराष्ट्र* बँकेने
आखलेल्या अनेक
बचत योजनापैकी एक

## आवर्त ठेव योजना

किमान पांच अगर पांचाच्या पटीत रक्कम
दरमहा या योजनेत गुंतवा व विनासायास
एकमुठी मोठी रक्कम मिळवा.

**दरमहा पाच रुपयांतून यथावकाश**
**रु. ३७९-३५ येवढी ठेव**
**निर्माण होईल.**

आताच बचत करा व गरजेच्या काळाची
सोय करा. शिवाय आता आपणास
व्याजाच्या वाढत्या दराचाही फायदा मिळेल.

*आमच्या आपल्या नजिकच्या शाखेचे*
*एजंट या योजनेचा सर्व तपशील*
*आपणास आनंदाने पुरवतील.*




आवर्त ठेव योजनेचे सुधारित दर ( २३-७-७४ पासून )

| रुपये ५ चे मासिक हप्ते | प्राप्य रक्कम (रुपये) | रुपये ५ चे मासिक हप्ते | प्राप्य रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १२ | ६३·०० | ७२ | ४९२·३५ |
| २४ | १३०·०० | ८४ | ६०७·२५ |
| ३६ | २०७·०० | ९६ | ७३४·१५ |
| ४८ | २८९·२० | १०८ | ८७४·३५ |
| ६० | ३७९·३५ | १२० | १०२९·२० |

**बँक ऑफ महाराष्ट्र**
११७७ बुधवार, पुणे ४११ ००२.

BOM & BAY/BM 7454 M

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



**TF ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २

१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २ आणि १६ ऑक्टोबर, १९७४





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## राज्य सहकारी बँकांचा कारभार ( १९६१–७२ )

### उत्साहवर्धक बाबींपेक्षा दोषांच्या बाबीच अधिक

रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक खात्याच्या ग्रामीण पाहणी विभागाने राज्य सहकारी बँकांची जिंदगी आणि देणी ( १९६१–७२ ) ह्यांच्या बदलत जाणाऱ्या परिस्थितीची पाहणी केली आहे. त्या पाहणीप्रमाणे पैसे जमा करणे आणि त्यांची गुंतवणूक करणे ह्यांत आकड्यांच्या दृष्टीने पुष्कळ सुधारणा झालेली आहे, परंतु त्यांच्या व्यवस्थापनात मात्र खूपच सुधारणेस जागा आहे. भाग-भांडवलांतील बरीच मोठी वाढ ही एक अनुकूल बाब आहे. दुसरी अनुकूल बाब म्हणजे त्यांनी जमा केलेल्या ठेवी. कर्ज पुरवठ्यातही वाढ झालेली आहे; अधिकाधिक कर्ज-पुरवठा बँका स्वतःच्या मालकीच्या पैशांतून करीत आहेत. रिझर्व्ह फंड मजबूत करण्याची त्यांची प्रवृत्तीही योग्यच आहे.

सहकारी संस्थांचा कमकुवतपणा असणाऱ्या कित्येक राज्यांतून भागभांडवलाची परिस्थिती अद्याप असमाधानकारक आहे. ठेवी वाढण्याची गती मंदावली आहे. सहकारी संस्थांनी एकमेकाला दिलेल्या रकमा ठेवीतील तीनचतुर्थांश वाढीस कारणीभूत आहेत. जास्त व्याजाच्या मुदती ठेवींचा भरणाही ठेवी वाढीतील मोठा भाग व्यापीत आहे. कमकुवत बँका अद्याप बराच मोठा कर्जपुरवठा रिझर्व्ह बँकेकडून कर्जे घेऊनच करतात. कित्येक राज्यांतील थकबाकीने चिंतनीय स्वरूप धारण केलेले आहे. उदाहरणार्थ, आसाम, बिहार, हिमाचल प्रदेश आणि प. बंगाल येथे थकबाकीने बँकांचे भागभांडवल आणि रिझर्व्हच नव्हे, तर ठेवींचा काही भागही खाऊन टाकला आहे. स्वतःजवळ पैसे शिल्लक असतानाही कित्येक बँकांनी कर्जाऊ पैसे घेतलेले आहेत.

राज्य सहकारी बँका ह्या त्या त्या राज्यातील केंद्रीय सहकारी बँका असल्यामुळे त्यांचेवर फार मोठी जबाबदारी आहे. त्यांनीच स्वतःला शिस्त लावून घेणे आवश्यक आहे. ठेवी जास्त मिळविणे, निष्कारण कर्जे काढून पैसे बिनव्याजी न राखणे, थकबाकीचे प्रमाण योग्य मर्यादेत आणणे, स्वतःचे भागभांडवल वाढविण्यापेक्षा ठेवी वाढविणे, ह्यावर त्यांनी भर द्यावा. पैसे तरते ठेवून, सुरक्षितता साधून, जास्तीत जास्त कमाई करण्याकडे बँकांनी लक्ष केंद्रित करावे. अधिक शिस्तबद्ध कारभाराची आवश्यकता आहे.

## राज्य सहकारी बँकांच्या वाढीचे तुलनात्मक आकडे

| | १९६१ | १९७२ |
|---|---|---|
| | ( कोटी | रु. ) |
| कचेऱ्यांची संख्या | १०९ | २०३ |
| वसूल भांडवल | १८·२४ | ४५·६९ |
| ठेवी | ७२·३३ | ३३०·४५ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ५·७६ | ५७·१७ |
| एकूण स्वतःचे पैसे | ९६·३३ | ४३३·३१ |
| घेतलेली कर्जे | १२५·३२ | २७०·०९ |
| एकूण खेळते भांडवल | २२१·६५ | ७०३·४० |
| येणे कर्ज | १६६·६८ | ५५२·७४ |
| गुंतवणूक | ३९·१३ | १०७·३३ |
| रोख, इतर बँकात व कॉल डिपाझिट्स् | १६·९९ | ५६·१४ |

## भारत हायड्रोजन स्फोट करण्याची शक्यता

ह्या वर्षाच्या १८ मे रोजी भारतीय शास्त्रज्ञांनी राजस्थानमधील वाळवंटात अणुस्फोट घडविला. भारत अणुशक्तीचा उपयोग शांततामय कार्यासाठीच करणार असल्याची ग्वाही सरकारतर्फे अनेकदा देण्यात आली असतानासुद्धा अणुविज्ञानात अग्रेसर असलेल्या देशांनी स्फोटाबद्दल विरोधी प्रतिक्रियाच व्यक्त केल्या. अणुविज्ञानाचा उपयोग शांततामय कामासाठी करण्याच्या भारताच्या इराद्याबद्दल जगातील देशांत शंका व्यक्त करण्यात येत असते; आणि ते साहजिकही आहे. कारण अणुविज्ञानाच्या सामर्थ्याचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारात अशा कामासाठी केल्याचे उदाहरण अद्याप घडावयाचे आहे. अशा परिस्थितीत भारतीय अणुविज्ञान मंडळाच्या शास्त्रज्ञांनी एका परदेशी वृत्तपत्राला दिलेली अलीकडील मुलाखत खळबळ उडविणारी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. ह्या मुलाखतीत अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सेठना आणि डॉ. रामण्णा म्हणतात की भारताच्या भविष्यकालीन अणुविज्ञान कार्यक्रमात हैड्रोजन स्फोट घडवून आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. डॉ. रामण्णा ह्यासंबंधी बोलताना म्हणाले की असा स्फोट घडविण्याच्या कामी भारताला न सोडविता येण्यासारख्या तांत्रिक अडचणी नाहीत. अणुशक्ती मंडळाच्या अंदाजपत्रकात काही काटछाट करण्यात आली असली तरी जरूर त्या संशोधनाचे काम चालू ठेवण्यात आले

आहे. १८ मेला करण्यात आलेला अणुस्फोट १५ किलो टन शक्तीचा होता. गुजरात भूगर्भात तेल सापडणारे खडकाचे थर १,८०० मीटर खोलीवर आहेत. तेव्हा त्यांचे विदारण करण्यासाठी २०० किलो टन शक्तीचा स्फोट करण्याची आवश्यकता आहे.

---

## विकासासाठी शेतीविषयक संशोधनास प्राधान्य द्या

येत्या नोव्हेंबर महिन्यात रोम येथे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विद्यमाने जागतिक अन्नधान्य परिषद भरविण्यात येत आहे. त्या परिषदेत विचारविनिमय करण्यासाठी संघटनेने एक दीर्घ प्रबंध तयार केला आहे. प्रबंधात असे आवाहन करण्यात आले आहे की अविकसित देशांची आजची सर्वात महत्त्वाची गरज शेतीचे उत्पादन वाढविण्याची आहे. त्यासाठी त्यांनी स्वतःच जोरदार प्रयत्न करावयास हवेत. शेतीविषयक संशोधनास प्राधान्य देण्याची अतिशय आवश्यकता आहे. अविकसित देशांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०·५ टक्के उत्पन्न शेतीविषयक संशोधनासाठी खर्च करण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवावे. १९८५ साल अखेरपर्यंत हे उद्दिष्ट गाठण्याचे प्रयत्न त्यांनी केले पाहिजेत. आज अशी परिस्थिती आहे की जे देश समृद्ध आहेत ते शेतीसंशोधनासाठी जितका खर्च करीत आहेत, तितकाही खर्च अविकसित देश करीत नाहीत. अर्धविकसित अगर मागासलेले देश विकसित देशांच्या संशोधनावरील खर्चाच्या एक पंचमांशच रक्कम खर्च करीत आहेत. आशियातील काही देशांत हरितक्रांती यशस्वी झालेली आहे. अधिक पीक देणारे नव्या प्रकारचे बियाणे, रासायनिक खताचा भरपूर वापर आणि पाण्याचा निश्चित पुरवठा ह्या त्रयीमुळे हरितक्रांती यशस्वी होते हे आता सिद्ध झालेले आहे. अविकसित देशांनी शेती संशोधनावर केलेल्या खर्चाची गुंतवणूक किफायतशीर होत नाही असे म्हणता यावयाचे नाही. त्याचबरोबर शेतीच्या व्यवसायात गुंतलेला सामान्य शेतकरी उत्पादन वाढविण्याच्या नव नव्या पद्धती स्वीकारण्यातील धोका पत्करण्यास तयार होणार नाही, असेही नाही.

---

## चोरट्या आयातीसाठी चांदीची मोठी निर्यात

हिंदच्या अर्थव्यवस्थेला चोरट्या मार्गाने परदेशातून आयात करण्यात येणाऱ्या मालाचा जबरदस्त धोका निर्माण झाला आहे. त्यातही तांदूळ-भुइमुगासारख्या जीवनावश्यक मालाची निर्यात करून चोरट्या आयातीचे बादशहा चैनीच्या वस्तू आयात करीत असतात. म्हणजेच पर्यायाने भुकेल्यांच्या गरजा मारून श्रीमंतांच्या विलासी 'गरजा' भागवीत आहेत. चोरट्या मालाच्या आयातीसाठी दरमहा सुमारे २ कोटी रुपयांची चांदी देशातून बाहेर पाठविण्यात येत आहे असा अंदाज करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांत भारतात चांदीची किंमत परदेशातील किंमतीच्या मानाने स्वस्त होती. त्याचा फायदा घेऊन चोरट्या व्यापारातील दादांनी रोज ६०० किलोग्रॅम चांदी बाहेर पाठविली. त्यातील बहुतेक निर्यात पश्चिम आशियातील देशांना करण्यात आली. चांदीची भारतामधील किंमत दर किलोग्रॅम मागे रु. १,००० ते १,१०० पर्यंत कमी-अधिक होत असते. चोरट्या मार्गाने भारतामधून दरसाल सुमारे २५ कोटी रुपयांची चांदी निर्यात करण्यात येते. तिचे वजन २ लाख, २० हजार किलोग्रॅमपर्यंत असते. परदेशातून चोरटा माल आयात करण्यासाठी त्यात गुंतलेल्या व्यापाऱ्यांना सोने, चांदी, हिरे व दुर्लभ परदेशी चलन ह्यांच्या रूपांत किंमत द्यावी लागते. सर्व भारतभर चांदी जमविण्याची केंद्रे त्यांनी स्थापन केलेली आहेत. त्यांना मुख्य पुरवठा होतो तो उत्तर भारतामधून. दिल्लीनूनही चांदी बाहेर जाते. जमविलेली चांदी महाराष्ट्र, कच्छ, गोवा व केरळ राज्यांच्या किनाऱ्यांवरून मार्गस्थ करण्यात येते.

---

## अमेरिकनांच्या रक्तात भिनलेले प्रदूषण

पृथ्वीवरील हवा, पाणी, समुद्र, इत्यादी नैसर्गिक संपत्तीचा हवा तसा उपयोग करून मनुष्य जात मानवी जीवनालाच धोका उत्पन्न करीत आहे असा इशारा शास्त्रज्ञांनी अनेकदा दिलेला आहे. तरीही ह्यासंबंधी प्रभावी उपाययोजना करण्याचे जगातील देशांना व संयुक्त राष्ट्र संघटनेलाही जमलेले नाही. मनुष्याच्या आरोग्याला बाधक ठरणारे धूम्रपान परदेशांप्रमाणे भारतातही वेगाने पसरत आहे. सामुदायिक प्रदूषणाप्रमाणे हाही एक वैयक्तिक प्रदूषणाचा प्रकार म्हटला पाहिजे. औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशांत दूषितीकरणाचा धोका खूपच वाढलेला आहे. त्यामुळे सामान्यतः व्यसनासक्त नसलेल्या नागरिकांच्या जीवितालाही अपाय पोचत आहे. ह्यासंबंधी अमेरिकेत नुकतीच एक पाहणी करण्यात आली आहे. देशातील मोठी शहरे धरून १८ प्रादेशिक विभागांतील २९ हजार नागरिकांच्या वैयक्तिक प्रदूषणासंबंधी पाहणी करण्यात आली असता असे आढळून आले की अमेरिकेत जे लोक धूम्रपान करीत नाहीत त्यांच्याही रक्तांत 'कार्बन मोनॉक्साइड' हा विषारी वायू आरोग्याचा घात करण्याइतक्या प्रमाणात आढळून आला. निदान निम्मे तरी अमेरिकन नागरिक असे आढळून येतील असा अंदाज करण्यात आला आहे. धूम्रपान न करणाऱ्यांची जर ही स्थिती तर त्या व्यसनाच्या तावडीत सापडलेल्यांची अवस्था अधिकच बिकट असल्यास नवल नाही. 'कार्बन मोनॉक्साइड' हा वायू रक्तातील तांबड्या पेशींशी संलग्न होतो. अर्थातच त्यामुळे माणसाची प्राणवायू फुप्फुसात घेऊन रक्ताचे शुद्धीकरण करण्याची शक्ती कमी होत जाते. हृदयविकाराने पछाडलेल्या रोग्यांना धूम्रपान करणाऱ्यांनी दिलेले रक्त देण्यात येऊ नये असा सल्ला डॉक्टर्स देऊ लागले आहेत.

---

जाहिरात-खर्चात कपात — सरकारी क्षेत्रातील सर्व संस्थांनी आपल्या जाहिरातखर्चात बचत करण्यासाठी कडक उपाययोजना करावी, असे मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्याने सांगितले आहे.

## विदेशी कंपन्यांतील नोकऱ्यांचे वाढते हिंदीकरण

### परंतु वरिष्ठ नोकरांत बिगर-हिंदीच अधिक

परदेशीयांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कंपन्यांतील २,००० रु. पेक्षा ज्यास्त पगाराच्या नोकऱ्यांच्या हिंदीकरणात आणखी प्रगती झाली आहे. परदेशी कंपन्यांनी नेमलेल्या अशा हिंदी लोकांची संख्या १ जानेवारी, १९६३ रोजी ३,१६१ होती ती १ जानेवारी, १९७३ रोजी ११,११६ झाली; म्हणजे दहा वर्षांत ती सुमारे चौपटीने वाढली. त्याच काळात बिगर-हिंदी नोकरांची संख्या २,९३४ ची ७२६ झाली, म्हणजे एक चतुर्थांशावर आली. एकूण नोकरांतील भारतीयांचे प्रमाण १९६३ मध्ये ५१·९% होते, ते दहा वर्षांनी ९३·९% झाले आहे.

१ जानेवारी, १९७३ रोजी २,००१ रु. ते ३,००० रु. पगाराच्या नोकरांपैकी ६,३८८ हिंदी आणि ४४ बिगर-हिंदी होते; ३,००१ रु. ते ५,००० रु. पगाराच्या नोकरांपैकी ३,४८७ हिंदी आणि ७८ बिगर-हिंदी होते. ५,००१ ते ७,००० रु. पगाराच्या नोकरांपैकी हिंदी ७८९ तर बिगर-हिंदी २०२ होते. ७,००० पेक्षा जास्त पगाराच्या नोकरात हिंदी २५६ तर बिगर-हिंदी ४०२ होते.

---

## वाढत्या, महाग होत चाललेल्या आयातीचे पैसे कसे देणार

परराष्ट्रीय हुंडणावळीच्या बजेटाचा विचार केला असता, निर्गतीची मिळकत आणि आयातीचे देणे ह्यांतील तफावत वाढत आहे असे आढळून येते. निर्गतीमुळे भारताला २,४०० कोटी रु. ची प्राप्ती होईल परंतु आयातीसाठी ३,१०० कोटी रु द्यावे लागतील. अन्नधान्याची मोठी आयात करावी लागेल, ती येथे हिशेबात धरलेली नाही. म्हणजे, ७०० कोटी रु. ची तूट निश्चित येणार आहे. भारत ज्या ज्या जिनसांची आयात करीत आहे, त्या सर्वांच्या किमती बाजारपेठेत वाढत आहेत. जुन्या किमतीप्रमाणे आयातीसाठी परवाने देण्यात आले ते कालबाह्य ठरणार आहेत. देशातील अन्नधान्याचे उत्पादन ठराविक होईल ह्या अपेक्षेने अन्नधान्याच्या आयातीची तरतूद केली गेली. हे सर्वच अंदाज चुकीचे ठरले आहेत, आणि बिकट समस्या निर्माण झाली आहे.

---

## विवाहित स्त्रियांवर निर्बंध; कुमारी मातांवर नाही

कु. हेलेन मॉर्गन ह्या वेल्स तरुणीची 'मिस युनायटेड किंग्डम' म्हणून निवड झाली. आता नोव्हेंबरमध्ये ती 'मिस वर्ल्ड'साठी स्पर्धेत भाग घेणार आहे. ती अविवाहित माता आहे. 'मिस वर्ल्ड' स्पर्धेच्या नियमाप्रमाणे विवाहित स्त्रियांना स्पर्धेत भाग घेता येत नाही, परंतु तो नियम हेलेन मॉर्गनला लागू पडणार नाही. कारण, ती कुठे विवाहित स्त्री आहे ! "माझ्या बेबीचा मला अभिमान वाटतो; मी अविवाहित माता आहे, ह्याची मला लाज वाटत नाही" असे कु. हेलेन मॉर्गन म्हणाली.

## स्मगलरांचे अलिशान हॉटेलात शाही स्वागत

(दोन आठवड्यापूर्वीची एक हकीकत)

मुंबईच्या फोर्ट विभागातील एका अलिशान हॉटेलात रेशमी अचकन आणि चुरिदार घातलेल्या एका मोठ्या पोटाच्या माणसाने आपल्या अर्धा डझन सहकाऱ्यांसह प्रवेश केला, तेव्हा सर्वत्र स्तब्धता पसरली. बारमन आणि सर्व वेटर्स त्याला सामोरे गेले आणि मॅनेजरने स्वतः येऊन त्याचे हात जोडून स्वागत केले. हॉटेलातल्या एका गिऱ्हाइकाने शेजारच्या वेटरला विचारले, "हा कोण गृहस्थ आहे ?" वेटर म्हणाला, "तुम्हाला माहीत नाही ! तो मुंबईतला एक प्रमुख इंटरनॅशनल स्मगलर आहे." त्या स्मगलर किंगच्या औदार्याच्या आणि थाटाच्या कित्येक आख्यायिका वेटरने सांगितल्या. हा स्मगलर आपल्या साथीदारांसह महागडी स्कॉच व्हिस्की पीत बसला होता. वेटरने सांगितले, "हे महाराज स्वतः कधीही पैशाचे व्यवहार करीत नाहीत; त्यांच्या एका हस्तकाजवळ नोटांची पुडकी असतात. एकदा एका वेटरने बिलातील शिल्लक रु. ६० परत आणले, तेव्हा ह्या महाराजाने त्याच्या थोबाडीत दिली आणि ओरडला, "मूर्खा, ती मोड तुझ्यापाशीच राहू दे." रु. ३०० पर्यंतही टिप्स दिल्या जातात."

मोठाले स्मगलर मोठमोठ्या इस्पितळात वैद्यकीय उपचारासाठी जातात, त्यांना स्वतःची ओळख लपविण्याचे काहीच कारण वाटत नाही. तेथील नोकरवर्गाला त्यांचेकडून भरपूर बक्षिशी मिळते. असाच एक स्मगलर जेव्हा इस्पितळातील उपचारानंतर घरी जाण्यास निघाला तेव्हा इस्पितळातल्या नोकरवर्गाने त्याला अश्रुपूर्ण डोळ्यांनी निरोप दिला. शानदार प्रचंड मोटारीत बसण्यापूर्वी त्याने शुश्रूषा करणाऱ्या नोकरांना घड्याळे, अत्तरे, साड्या, इतर महाग कापड, बिस्किटांचे आणि चॉकोलेटचे डबे, इत्यादींच्या देणग्या दिल्या.

---

## मातृहृदयाला राजकारण्यांचे वावडे

भारतामधील ब्रिटिश राजवटीचे शेवटचे व्हॉइसरॉय लॉर्ड मौंटबॅटन ह्यांच्या मातेला राजकारणी लोकांचे वावडे होते. त्याला कारण त्यांचा अनुभव. लॉर्ड मौंटबॅटन ह्यांचे वडील जर्मन होते. १९१४ साली सुरू झालेल्या पहिल्या महायुद्धाच्या वेळी ते ब्रिटनच्या नौदलाचे अधिपती होते. पण त्यांच्या जन्मकहाणीमुळे त्यांना ते पद सोडावे लागले होते. ह्या प्रसंगाची आठवण लॉर्ड मौंटबॅटन ह्यांच्या मातेच्या मनात घर करून राहिली होती. १९४६ साली त्यांची भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली त्या वेळी त्यांना चिंतेने ग्रस्त केले. त्यांनी ही जागा न स्वीकारण्याचा सल्लाही आपल्या चिरंजीवांना दिला होता. त्यांच्या चरित्रात ही माहिती प्रथमच देण्यात आली आहे.

---

## जीवनावश्यक वस्तूंच्या किमती किती वाढल्या ?

बुधवार, दि. ११ सप्टेंबर रोजी मुंबईमधील १०,००० महिलांनी भाववाढविरोधी मोर्चा नेऊन घोषणा केल्या. त्यात मदनपुऱ्यातील बुरखाधारी मुसलमान महिलाही सामील झाल्या होत्या. वाढती महागाई आता अगदी असह्य झालेली आहे, ह्याचे ते बोलके चित्र होते. गेल्या १२ महिन्यांत मुंबईमधील जीवनावश्यक जिनसांचे भाव किती वाढले आहेत, ते खालील तक्ता दर्शवितो.

### मुंबईमधील जीवनावश्यक जिनसांच्या किरकोळ व्यापाराच्या किमती

| जिन्नस | वजन–माप किलो | सप्टें. १९७४ | सप्टें. १९७३ | सप्टें. १२७२ | सप्टें. १९७२ च्या मानाने सप्टें. १९७४ मध्ये वाढ % |
|---|---|---|---|---|---|
| तांदूळ रेशन | ,, | १·५४ | १·३३(R) | १·३३ | १५·८ |
| खुला | ,, | ४·५० | ४·२५ | ४·०० | १२·५ |
| गहू रेशन | ,, | १·३८ | १·२३ | ०·७९ | १२·२ |
| खुला | ,, | २·२५ | २·०० | २·०० | १२·५ |
| मूग डाळ | ,, | ३·४५ | ३·९० | २·९२ | १८·२ |
| हरबरा डाळ | ,, | ३·२० | २·६२ | १·७६ | ८१·८ |
| उडीद डाळ | ,, | ३·०० | ३·४४ | ३·४४ | १२·८ |
| तूर डाळ | ,, | ४·२५ | ३·२० | ३·१० | ३७·१ |
| भुइमूग तेल | ,, | १०·०० | ९·१५ | ४·५५ | ११९·८ |
| खोबरेल तेल | ,, | १४·०० | १०·३६ | ६·८० | १०६·० |
| वनस्पती | ,, | १२·२७ | ८·२० | ६·१९ | ९८·२ |
| बटाटे | ,, | १·४५ | १·४६ | १·२१ | १९·८ |
| कांदे | ,, | ०·७५ | ०·९७ | ०·५९ | २७·१ |
| टोमॅटो | ,, | २·०० | १·७० | १·५६ | ३८·२ |
| साखर खुली | ,, | ६·०० | ३·८४ | ३·२४ | ८५·२ |
| रेशन | ,, | २·१५ | २·१५ | २·०५ | ४·९ |
| दूध | लिटर | ४·०० | ३·१८ | २·८९ | ३८·३ |
| मीठ किलो | ,, | ०·६३ | ०·२८ | ०·२९ | ११७·२ |
| गूळ | ,, | ३·०० | ३·४१ | २·६० | १५·४ |
| चहा (रेड लेबल | ... | ... | ... | ... | ... |
| ब्रुक बाँड ) | ,, | ८·०५ | ६·६० | ७·१० | १३·४ |
| मटण | ,, | ११·०० | ८·७५ | ७·२२ | ५२·३ |
| मासे | ,, | ८·५० | ७·५३ | ४·७३ | ७९·७ |
| अंडी | डझन | ५·४० | ५·०१ | ४·११ | ३१·४ |

**डाक्यांत निर्वासितांचे लोंढे**—बांगला देशात गेल्या काही महिन्यांत पुराने अभूतपूर्व थैमान घातले. भुकेकंगाल लोकांचे थवेच्या थवे ढाका शहरात येत आहेत. सुमारे १० लाख लोक शहरात आले आहेत. रेल्वे स्टेशन्स, बागा आणि रस्त्यावरील पदपथ त्यांनी भरून गेले आहेत.





## नोकरशाहीला बिघडविणारे राजकीय नेतृत्व

नियोजन समितीचे माजी सभासद व एक प्रमुख अर्थशास्त्रज्ञ डॉ. मिन्हास ह्यांनी सरकारने सध्या चालविलेल्या चोरट्या व्यापाराच्या निर्मूलनाच्या मोहिमेचे स्वागत केले आहे. ते म्हणतात की, सरकारने योग्य दिशेने उचललेले हे पाऊल आहे. मात्र अशीच मोहीम करचुकव्यांविरुद्ध आणि काळ्या बाजारवाल्यांविरुद्ध चालू करण्यास सरकार का कचरत आहे ते समजत नाही. चलनवाढीविरोधी उपाय योजण्याबाबत सरकार जर प्रामाणिक असले तर ह्या दोन्ही आघाड्यांवर एकदम व जलद उपायांची अमलबजावणी करण्यात आली पाहिजे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापर्यंत वाट पाहण्याची काय गरज आहे ! खरे तर सरकारजवळ समाजविरोधकांची यादी आजही तयार आहे. सध्याच्या आर्थिक दुरावस्थेचे कारण राजकीय नेतृत्व, आर्थिक गैरव्यवहार आणि दुर्बलता ह्या दोषांनी ग्रस्त झालेले आहे हे आहे. भारत सध्या अतिशय गंभीर अशा आर्थिक दुखण्याने पछाडलेला आहे. देशाची अराजकाकडे होणारी वाटचाल थांबवावयाची असले तर दुतोंडी भाषा बंद करून निश्चयात्मक मार्गक्रमण करण्यात आले पाहिजे. सरकार आपल्या अपयशाचे खापर नोकरशाहीवर फोडू पाहात आहे. खरी स्थिती अशी आहे की, राजकीय नेतृत्व आपल्या आर्थिक धोरणाबद्दल स्वतःच्या मनाशीच स्वच्छ नाही. आर्थिक ध्येय-धोरणाबद्दल निश्चितपणा दिसू लागला तर नोकरशाही आपले काम कोणत्याही अडथळ्याला न जुमानता चोख बजावेलच बजावेल. भारताची नोकरशाही चांगली कार्यक्षम आहे. परंतु तिला राजकीय नेतृत्वाने बिघडविले आहे.

सध्याची बिकट आर्थिक परिस्थिती शेतीकडे करण्यात आलेल्या भीतिप्रद अनावस्थेतून उगम पावली आहे. चलनवाढ ही घटना काही पैशाच्याच स्वरूपाची फक्त आहे असे नाही. मुळात चलनवाढीला अन्नधान्यापासून सुरुवात होते. एका बाजूला सरकार अन्नधान्याच्या जास्तीत जास्त उत्पादनावर जोर देते आणि त्याचबरोबर पंचवार्षिक कार्यक्रमात शेतीवर करावयाच्या संकल्पित खर्चात कपात करते ही गोष्ट हास्यास्पद आहे. चलनवृद्धीच्या घोड्याला आवरावयाचे असेल तर जास्तीत जास्त पैशाची व्यवस्था करून अन्नधान्याच्या उत्पादनासाठी अत्यंत कसोशीने प्रयत्न करण्यात यावयास पाहिजेत. त्याचबरोबर अन्नधान्याच्या वाटपाची सुनियंत्रित आणि व्यवहार्य अशी पद्धतही उभारण्यात आली पाहिजे. सध्या देशातील अनेक भागात दुष्काळी अगर तत्सम परिस्थिती निर्माण झालेली आहे. हा काळ कठीण जाणार आहे. त्यातून तरून जाण्यासाठी ह्या वर्षी जवळ जवळ ८० लाख टन अन्नधान्याची आयात करावी लागणार आहे. विकास योजनांच्या कार्यक्रमाची आखणी आणि त्याची अमलबजावणी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून कोणताही आर्थिक कार्यक्रम घेतला तरी त्याच्या अमलबजावणीचा विचार करण्याशिवाय गत्यंतरच नसते. पण सध्या ज्या पद्धतीने पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यात येतात आणि त्यांची अमलबजावणी होते, तीमुळे लोकांचा आर्थिक नियोजनावरील विश्वासच ढळला आहे. नियोजित अर्थव्यवस्थेत निर्बंध हे येणारच पण त्यांची सुसंगत आखणी करण्यात आली तरच ते यशस्वी होतील.

---

## उंच्या गगनचुंबी इमारती बांधण्यावर नियंत्रण

देशातील सिमेंटचा तुटवडा भरून काढण्यासाठी अधिक उत्पादन व्हावयास पाहिजे हे तर खरेच; पण दरम्यान उपलब्ध सिमेंटचा वापर अधिक काटकसरीने आणि सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीने करावयास पाहिजे. ह्या दृष्टीने भारत सरकारच्या इमारत व बांधकाम खात्याचे मंत्री श्री. ओम मेहता ह्यांनी केलेला सरकारी धोरणाचा खुलासा स्वागतार्ह म्हटला पाहिजे. दिल्ली येथे एका प्रसंगी बोलताना ते म्हणाले की सिमेंट व पोलाद ह्या बांधकामासाठी लागणाऱ्या सामानाचा देशात तुटवडा आहे. म्हणून मोठाल्या शहरांत ज्या गगनचुंबी इमारती बांधण्यात येतात त्यांच्यावर काही निर्बंध घालण्याचा सरकारचा विचार आहे. राज्य सरकारांना भारत सरकारने असे आवाहन केले आहे की त्यांनी आपल्या भागातील बांधकामात जास्तीत जास्त प्रमाणात बांधकामाचे स्थानिक सामान वापरण्यास उत्तेजन द्यावे. सिमेंटचा तुटवडा असला तरीसुद्धा काही प्रमाणात त्याची निर्यात करणे सरकारला भाग पडत आहे. कारण अशी निर्यात केल्याशिवाय तेल आणि अन्नधान्य ह्यांची आयात करणे शक्य होणार नाही. त्याचबरोबर देशातील सिमेंटच्या उद्योगधंद्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याचे कामही सरकार हाती घेणार आहे. राहत्या घरांचा सध्या फार मोठा तुटवडा जाणवत आहे. बांधकाम करण्याच्या नव्या पद्धती आणि नवीन तंत्रे ह्यांचा अवलंब केल्यास हा प्रश्न सुटण्यास चांगली मदत होण्यासारखी आहे. बांधकामात सध्या बराच विस्कळीतपणा आहे. त्यांपूर्वी बांधकामात गुंतलेल्या धंदेवाल्यांनी काही प्रमाणित कार्यपद्धती स्वीकारली तर सामानाच्या वापरात पुष्कळ बचत होण्यासारखी आहे. तयार बांधकामाचे साहित्य त्यांना वापरता येईल.

---

## रणजी ट्रॉफी खेळाडू, सिकॉमचा मॅनेजिंग डायरेक्टर

मध्य प्रदेशाकडून रणजी करंडक क्रिकेट सामन्यात खेळलेले ३८ वर्षांचे श्री. एस्. एस्. केळकर ह्यांची स्टेट इंडस्ट्रिअल ॲंड इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. च्या मॅनेजिंग डायरेक्टरपदी नेमणूक झाली आहे. त्यांनी पूर्वी मध्यवर्ती संरक्षण आणि गृहखात्यात काम केलेले आहे. १९६९–७२ मध्ये ते अर्थमंत्रालयातील बँकिंग खात्यामध्ये होते. १९६९ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ते फोर्ड फाउंडेशनचे फेलो होते.

---

### हाअसंच्या बरखा ऊस देण्याची सक्ती करणे बेकायदेशीर

साखरकारखान्यांकडे जेवढा ऊस नोंदलेला असेल तो वगळता उरलेला ऊस कोणत्याही बाहेरच्या साखरकारखान्यास घेता येईल, त्यामुळे कायद्याचा कोणताच भंग होत नाही, असा महत्त्वपूर्ण निवाडा मुंबई हायकोर्टाने नुकताच दिल्याने सहकारी साखर-कारखानदारी क्षेत्रात बरीच खळबळ उडाली आहे.

साखरकारखान्यांचे कार्यक्षेत्र ठरलेले असते. त्या कार्यक्षेत्रातील उसावर त्याच कारखान्यांचा हक्क असल्याचा समज होता. उसाची पळवापळवी होऊ नये म्हणून ऊसपुरवठ्यासाठी शासनाने काही विभागही पाडले होते. त्या विभागातील ऊस त्याच कारखान्यास घातला पाहिजे असा दंडक मानलेला होता.

ऊस पळवापळवीची स्पर्धा झाली असती तर उसाचे भाव कडाडले असते. त्यामुळे साखर महाग राहिली असती अथवा त्या स्थितीत साखरउत्पादन परवडले नसते, हे सर्व टाळण्यासाठी शासनसंमतीने विभाग केलेले होते, अशी माहिती सांगितली जाते.

शासनाने संमत केलेला साखरकारखाना विभागातील ऊस-उत्पादक तेथील कारखान्याचा सभासद असो वा नसो, त्याने त्या विभागातील, कारखान्यास ऊस दिला पाहिजे असाच सर्व-साधारण समज दृढ होता. त्याला हायकोर्टाच्या निवाड्याने चांगलाच तडा गेला.

या निवाड्याने आता काही सहकारी साखरकारखान्यांची स्थिती अधिकच अडचणीची होईल तर ऊसपुरवठ्याच्या संकटात असणारे काही खासगी साखरकारखाने आता जादा साखर-उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवतील, असे जाणकारांचे मत आहे.

---

### इंग्रज पतीच्या जपानी पत्नीचे पुत्र-संवर्धन

सुमिको डेव्हिस ही जपानी तरुणी असून विवाहाने इंग्लिश नागरिक बनलेली आहे आणि इंग्लंडमध्ये पतीबरोबर राहते; तिला १० महिन्यांचा एक मुलगा आहे, त्याचे नाव केन. "तू केनला कोणत्या पद्धतीने वाढविणार ? इंग्लिश का जपानी ?" असे तिला विचारले असता ती म्हणाली, "प्रथम तरी त्याची भाषा इंग्रजीच राहील, असे दिसते. तो दोन वर्षांचा झाला, म्हणजे मी त्याला जपानी भाषा शिकवीन आणि वागण्याची पद्धतही लावीन. इंग्लंडमधल्या शाळांतून मुले एकमेकाला दमदाटी वायला शिकतात, तर जपानमध्ये शिस्तीला विशेष महत्त्व दिले जाते. जपानमध्येही मुले सर्वांना आवडतातच, पण त्यांची संख्या इतकी मोठी आहे की, त्यांना शिस्तबद्ध आणि सुनियंत्रित जीवनाची शिकवण घ्यावीच लागते. आणखीही एक गोष्ट मी केनला शिकवीन, ती म्हणजे आपल्या वाट्याला आलेले जीवन आनंदाने पत्करणे. ही प्रवृत्ती पौर्वात्य असली तरी ती कुठेही उपयोगी पडणारी आहे."

---

### जागतिक आर्थिक अरिष्टाचे भूत

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या चालू अधिवेशनापुढे फ्रान्सच्या परराष्ट्रमंत्र्यांनी जागतिक आर्थिक अरिष्टाच्या धोक्याचा इशारा दिला आहे. ते म्हणतात की, संघटनेपुढे हाच विषय प्रमुख्याने वावरत आहे. कोणत्याही देशाने एकतर्फी आर्थिक निणय घेतले तर त्याचे कायमचे भले कधीही होणार नाही. सध्या सर्व जगावर आर्थिक अशाश्वततेची सावली पडलेली आहे. त्याचे कारण चौखूर उधळलेली चलनवृद्धी हे आहे. ही सावली आता इतकी गडद झाली आहे की जागतिक आर्थिक अरिष्टास कारणीभूत ठरणारी सर्व परिस्थिती आता अगदी पिकत आली आहे. तेलाच्या व इतर कच्च्या मालाच्या भडकत जाणाऱ्या किमतींनी जगाच्या बाजारपेठेच्या यंत्रणेला जबरदस्त धोका निर्माण झाला आहे. उत्पादन व व्यापार ह्यांचा ओघ खंडित होत चालला आहे.

---

### पुनः रविवारी मोटरवाहतूक बंद नको !

पेट्रोलच्या अकल्पित तुटवड्यामुळे पश्चिम जर्मनीत रविवार, २५ नोव्हेंबर, १९७३ रोजी मोटरगाड्यांची वाहतूक सक्तीने बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर नऊ महिन्यांनी सबंध जर्मनीभर प्रसूतिगृहात अर्भकांचे पीकच आल्याचे आढळून आले. एका प्रसूतिगृहात ऑगस्टमध्ये १९० अर्भके जन्मास आली; एक वर्षापूर्वी त्याच महिन्यात १२८ जन्मांची नोंद झाली होती. दुसऱ्या एका शहरातील प्रसूतिगृहातून ऑगस्टमध्ये १४८२ बालकांचा जन्म झाला. गेल्या वर्षीच्या ऑगस्टमधील आकडा १३१२ होता. रविवार असल्यामुळे सर्व पुरुष मोटारीतून बाहेर पडू न शकल्याने घरीच राहिले, त्याचा हा परिणाम.

---

**उत्तर प्रदेशची थकलेली देणी** — भारत हेवी इलेक्ट्रिकल्सला चालू देणी मागविणेही कठीण जात आहे ; त्याचे देणेकरी, उत्तर प्रदेशचे सरकार, ह्याने १०० कोटी रुपयांचे देणे थकविले आहे ! वीज केंद्रासाठी घेतलेल्या यंत्रसामग्रीची किंमत राज्य सरकारने भारत हेवी इलेक्ट्रिकल्सला दिलेलीच नाही. उत्तर प्रदेश सरकारच्या वीज केंद्रांना कोल माइन्स ऑथॉरिटीने पुरविलेल्या कोळशाचे ३३ कोटी रु. असेच थकलेले आहेत.

**उकाई वीजप्रकल्पाला मान्यता**— गुजरात राज्यातील उकाई औष्णिक विद्युतकेंद्राच्या विस्ताराला नियोजन समितीने मान्यता दिली आहे. ह्या विस्तारासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री आणि इतर साधने देशात तयार झालेलीच वापरण्यात येणार आहेत. विस्तार योजना पूर्ण होण्यास १९७८–७९ साल उजाडेल. केंद्र कोळशाच्या जळणावर चालणार आहे.

**बाकांऐवजी खुर्च्या**—पॅरिस नगरी ही जगातील एक अत्यंत सुंदर व रम्य नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. तेथे भुयारी रेल्वेमध्ये नुकतीच एक सुधारणा करण्यात आली. रेल्वे स्थानकावरील बाके काढून त्याऐवजी खुर्च्या ठेवण्यात येणार आहेत. कारण, पॅरीस-मधील बेघर लोक पुष्कळ वेळा, विशेषतः पाऊस पडत असल्यास, या बाकांचा उपयोग झोपण्यासाठी करतात.

### तेलाची संपत्ती असणाऱ्या राष्ट्रांना इशारा

जागतिक इंधनशक्तीसंबंधी भरविण्यात आलेल्या परिषदेत अमेरिकेचे अध्यक्ष मि. फोर्ड ह्यांनी पश्चिम आशिआतील तेल सापडणाऱ्या राष्ट्रांना काहीशी कडक समज दिली आहे. ह्या देशांनी खनिज तेलाच्या किमती वाढविल्यापासून सर्व जगावरच आर्थिक संकटे कोसळत आहेत. त्यातही अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील प्रगत देश ह्यांना नव्या परिस्थितीचा फटका विशेष जाणवत आहे. कारण, तेथील उच्च राहणीमानाची घसरण होण्याची भीती उत्पन्न झाली आहे. प्रे. फोर्ड म्हणतात की, अरब देशांनी तेलाच्या किमतीबाबतच्या धोरणाचा पुनर्विचार केला पाहिजे. त्यांनी तेलाच्या किमती कमी केल्या नाहीत अगर आपल्या साधनसंपत्तीचा गरजू देशांना फायदा घेऊ दिला नाही तर फार घातक परिणाम होतील. जगातील देश ही गोष्ट सहन करणार नाहीत. जगातील बाजारपेठातील भाव कृत्रिम रीत्या चढवून ती विस्कळित करण्याचे त्यांचे धोरण म्हणजे एक प्रकारची हुकूमशाहीच आहे. जगातील देशांनी त्यांच्याजवळील नैसर्गिक संपत्तीचा सर्व मानवजातीच्या हितासाठी उपयोग करू दिला नाही तर किती नुकसान होईल अगर काय भयंकर परिणाम होतील ते सांगता येणार नाहीत. जगातील इंधनशक्तीचा विचार करताना प्रलयाची भाषा वापरल्याखेरीज चालत नाही, इतके हे संकट विनाशकारी आहे. धोका अगदी स्पष्ट दिसत आहे, त्याची तीव्रताही उघड दिसत आहे. तथापि आशा सोडण्याचे कारण नाही. कारण एकमेकांविरुद्ध उभे ठाकण्याऐवजी सहकार्य केले तर मोठा फायदा आहे हेही स्वच्छ दिसत आहे. म्हणूनच आशावादाला काही तरी जागा आहे.

---

### रेल्वेचा हमाल लक्षाधीश कसा झाला!

भारत सरकारने चोरट्या व्यापाराविरुद्ध तडाखेबंद मोहीम सुरू केल्यापासून अनेक सुरस कथा उजेडात येत आहेत. अहमदाबादमध्ये पकडण्यात आलेल्या धर्मादासाची कथा त्यांपैकीच एक आहे. त्याचे खरे नाव धर्मादास शामलाल हे आहे. हा माणूस एक साधा रेल्वे हमाल होता. पण नंतर त्याने चोरट्या व्यापाराच्या व्यवसायात प्रवेश करून घेतला. त्यात त्याला चांगलेच यश आले. चोरट्या व्यापारात त्याने लक्षावधी रुपये मिळविले. पण तरीही तो अगदी वरच्या श्रेणीचा दादा मात्र नाही; दुय्यम प्रतीचाच आहे. चोरटा व्यापार गुपचुप करता यावा म्हणून त्याने एक होटेल घातले. एक केशकर्तनालय चालू केले. ह्याच धंद्यात आपण पैसा कमाविला असे तो सांगतो. चोरटा व्यापार झाकण्याची ही दुकाने साधने म्हणून वापरण्यात आली असे पोलिसांना आढळून आले. युसुफ पटेल हा कुप्रसिद्ध चोर व्यापारी अहमदाबाद, सौराष्ट्र आणि कच्छ भागात अनेकदा येत जात असे. तो कच्छी मेमन जातीचा आहे. त्याने आपले अनेक जातभाई ह्या व्यवसायात आणलेले आहेत. पटेल स्वतः खादी वापरतो. राजकारणाची चर्चाही उत्तम तऱ्हेने करू शकतो. हाजी मस्तान हा दुसरा एक मोठा चोरव्यापारी. तोही अहमदाबादमध्ये अनेक वेळा येत असे. त्याच्याबरोबर एक प्रख्यात सिनेनटही कधीकधी येत असे. सुमारे सहा महिन्यांपूर्वी चोरट्या व्यापारात गुंतलेले अनेक बडे दादा त्यांच्यापैकीच एकाच्या घरी झालेल्या लग्नासाठी एकत्र जमले होते. लग्नाच्या मंडपाबाहेर अनेक परदेशी गाड्यांची रांग लागली होती आणि आत अस्सल स्कॉच व्हिस्कीचा पूर वहात होता.

---

### को-ऑप. सोसायट्यांच्या रजिस्ट्रारने नेमलेला अधिकारी न्यायाधीशच होय

को-ऑपरेटिव्ह सोसायटीजच्या रजिस्ट्रारने सहकारी घरबांधणीच्या भाडेकरूंच्या तंट्यात एखादा अधिकारी खास कामासाठी नेमला आणि त्यांच्यासमोर एखाद्या प्रकरणाचे कामकाज चालले, तर त्या अधिकाऱ्याला कोर्टाचा दर्जा प्राप्त होतो का, या प्रश्नाचा निर्णय मुम्बई हायकोर्टाचे न्यायमूर्ती श्री. वैद्य आणि श्री. सप्रे यांनी दिला आहे.

या प्रकरणातील आरोपी कुलाब्याची सोनी नैना हिला "कोर्टाची बेअदबी" केल्याच्या आरोपाखाली तीन महिने साध्या तुरुंगवासाची शिक्षा त्यांनी फर्माविली. दुसरा आरोपी कॅस्ट्रोल लिमिटेडचा एक कर्मचारी पी. डी. महाजन याला कोर्टात याच आरोपाखाली खटला चालण्यासाठी हजर करावे असाही हुकूम कोर्टाने दिला.

कुलाब्याच्या न्यू पुष्पा विहार सहकारी घरबांधणी सोसायटीत जानकी हसाराम ही राहात होती तिने आपला फ्लॅट महाजन याला लीव्ह-लायसेन्स पद्धतीवर दिला. नंतर या प्रकरणी वाद निर्माण झाला, तो को-ऑपरेटिव्ह रजिस्ट्रारचे खास अधिकारी म्हणून श्री. व्ही. बी. पोतदार यांच्यासमोर चालला. महाजन याला दिलेला हुकूम त्यांनी पाळला नाही व फ्लॅट सोनी हिला दिला. सोनी हिनेही फ्लॅट खाली करण्याचे श्री. पोतदार यांच्यासमोर मान्य करून फ्लॅट खाली केला नाही. श्री. पोतदार यांचा हुकूम न मानणे, ही कोर्टाची बेअदबी होते, असा निर्णय न्यायमूर्तींनी देऊन असा अधिकारी म्हणजे कोर्ट, हे मान्य केले.

---


### व्यवस्थापनपद्धत सुधारण्यास वाव

"व्यवस्थापनाच्या पद्धतीत सुधारणा करण्यास खूप वाव आहे, ह्याची भारतात बरीच जाणीव दिसून आली" असे मत फ्लॉरिडा ॲटलांटिक विद्यापीठातील मॅनेजमेंटचे प्राध्यापक जोइल ई. रॉस ह्यांनी मुंबईत व्यक्त केले. व्यवस्थापनात तज्ज्ञ होण्याजोग्या माणसांचा तुटवडा भारतात आढळणार नाही, असेही ते म्हणाले.

---

# "भिडे" ओव्हर पिक

पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"



## भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;

—सांगली—

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक

फोन नं. २०६१



# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :–३०३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह


क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



## ★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—


आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,

त्यांस "विजय" पंपाची

आवश्यकता आहेच.



कारखानदार—

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

फोन : १३२

तार : Vijayplow

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

# पेट्रोल-तेल महागाईचे दुष्परिणाम

आपण अधिक पीक देणाऱ्या धान्याच्या जातींची लागवड करून हरितक्रांती घडवून आणली; परंतु ही पिके धडधाकट नसतात. कृमि-कीटक-नाशकांच्या मदतीसेरीज त्यांचा टिकाव लागत नाही. त्यांना खतही भरपूर लागते. या दोन्ही बाबतीत आपण आयातीवर अवलंबून आहो. त्यातच आयात तेलाच्या महर्गतेमुळे कशाच्याच आयातीसाठी मोबदला देण्यास आपणाजवळ पुरेसे साधनच नाही. भारतासारख्या देशांवर ओढवलेल्या आपत्तीची कल्पना खालील विवेचनावरून येईल.

पेट्रोल महाग झाल्यामुळे अविकसित आणि विकसनशील देशांवर केवढी मोठी आपत्ती ओढवत आहे, याची कल्पनाच करवत नाही. या आपत्तीविषयी सर्वत्र अज्ञान आहे. ३९ अविकसित देशांच्या तेलाच्या गरजेविषयी जागतिक बँकेने तयार केलेला अहवाल अद्याप गुप्त ठेवला आहे. कारण त्या अहवालामुळे गरीब देशांतील लोक भीतीने गांगरून जाण्याचा संभव आहे.

तेलाच्या महागाईच्या आणि दुर्मिळतेच्या आपत्तीमुळे अमेरिकेतील लोकांना स्वतःच्या मोटारीतून जाण्याऐवजी बसचा अवलंब करावा लागेल, जपानमध्ये आणि युरोपात अधिक त्रास सहन करावा लागेल, पण आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका येथे विनाशच कोसळेल असे अमेरिकन सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्टपणे म्हटले आहे.

या संदर्भात भारताचे उदाहरण देऊन 'दि प्लेन ट्रुथ' मासिकाने या आपत्तीचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले आहे. सुमारे ८० अविकसित देशांनी आयात होणाऱ्या तेलावर आणि खतावर आपल्या विकासाची स्वप्ने रंगविलेली आहेत. अन्न आणि शेती संघटनेचे प्रमुख डॉ. अॅडेका बोअर्मा यांनी म्हटले आहे, "भारतात १९६५ मध्ये चांगली पिके आली नाहीत, त्यावेळी अमेरिकेने धान्य पाठवून भारतीयांची उपासमार थांबविली. पण पुन्हा भारतात दुष्काळ पडला, तर काय होईल हे सांगता येत नाही. इंडोनेशियाची तीच गत आहे. म्हणून मी धोक्याची सूचना देत आहे."

अमेरिका आणि कानडा बाकीच्या देशांना लक्षावधी टन धान्य पाठविण्याच्या परिस्थितीत आज नाहीत. रशिया प्रभृती देशांकडे अमेरिकेने प्रचंड प्रमाणावर धान्य निर्यात केले आहे आणि अमेरिकेचा धान्यसाठा बहुतेक संपला आहे. सर्वच देश आता १९७४ साल पिकाच्या दृष्टीने चांगले ठरण्यावर अवलंबून आहेत. अमेरिकेत दर १९ ते २० वर्षांनी एकदा अवर्षण पडते आणि त्याची पाळी आता आली आहे. १९७५ ते १९७८ च्या दरम्यानचा काळ अमेरिकेला कमी-अधिक अवर्षणाचा जाईल आणि त्यामुळे दोन-तीन वर्षे अमेरिकेत पीक कमी आले तर कितीतरी देशांवर भयानक आपत्ती ओढवेल असे हवामानतज्ज्ञांचे अंदाज आहेत. अमेरिकेच्या गव्हाच्या उत्पादनापैकी तीनचतुर्थांश इतका गहू अमेरिका आज निर्यात करीत आहे. दोनतृतीयांश तांदूळ आणि निम्मा सोयाबीन परदेशी पाठवीत आहे. अविकसित देशांचे अमेरिकेवरील (आणि कानडावरील) धान्याचे अवलंबन अशा रीतीने धोक्याचे आहे.

अशा धान्य परिस्थितीत अविकसित देश तेलाची आणि कृमिकीटकनाशकांची आयात करण्यासाठी पैसे कसे देऊ शकणार? आज जगातील बहुतेक देशांतून कमी पीक देणाऱ्या परंतु कृमिकीटकांना दाद न देणाऱ्या जातींच्या धान्याच्या पिकांची जागा भरपूर पीक देणाऱ्या, परंतु कीटकांच्या भक्ष्यस्थानी सहज पडू शकणाऱ्या पिकांनी घेतली आहे. त्यामुळे हरितक्रांतीला कृमिकीटकनाशकांच्या सतत आणि पुरेशा पुरवठ्याची जोड आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य झाली आहे. याचा अर्थ, तेलाच्या समस्येचा कित्येक देशांच्या शेतीवर विपरित परिणाम घडून येणार आहे. धान्याच्या उत्पादनात घट, कृमि-कीटकनाशकांचा तुटवडा, शेतीवरील यंत्रांना तेलाचा अपुरा पुरवठा, धान्याच्या आयातीची फारच थोडी शक्यता आणि या सर्वांबरोबर लोकसंख्येची भरमसाट वाढ, या सर्वांमुळे अविकसित देशांची पुच्छप्रगतीच संभवते. गरीब देशातील असंख्य लोकांवर उपासमारीने मृत्यू येण्याची पाळी असंभवनीय नाही.

(लेखक : श्री. वा. काळे, "स्वराज्य," ७-९-७४)

---

## वालचंदनगर सहकारी बँकेच्या हितचिंतन फंडाचा सदुपयोग

वालचंदनगर इंडस्ट्रीज लि., या उद्योग केंद्राचे कामगार व स्थानिक सहकारी व संलग्न संस्थांचे कामगार यांचेसाठी वालचंदनगर सहकारी बँक सहा वर्षापूर्वी स्थापन झाली. बँकेने आपल्या सभासदांकरता सभासद हितचिंतन फंड (बेनेव्होलंट फंड) स्थापन केला आहे.

बँकेच्या सभासदाला फंडाचे सभासदत्व स्वेच्छेने स्वीकारावे लागते. असा सभासद मृत्यू पावल्यास त्याचे पश्चात त्याचे कुटुंबियांस फंडातून रु. १,००० रोख मदत दिली जाते.

दि. १४-८-७४ रोजी वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. चे तेथील प्रमुख कार्याधिकारी श्री. स. द. जोशी यांच्या हस्ते मदतीचे पहिले दोन चेक्स् श्रीमती मालनबाई माने व श्रीमती विठाबाई गाढवे यांना त्यांचे पतीचे मृत्यूनंतर देण्यात आले. ही घटना कामगार कल्याणाची असल्यामुळे कामगार वर्गात समाधान व फंडास वाढता पाठिंबा देण्याचे वातावरण दिसून येते.

---

मोटर वाहनात वाढ — सर्व तऱ्हेच्या मोटर वाहनात मिळून १० वर्षांत २५०% वाढ झाली. मार्च, १९६२ मध्ये त्यांची संख्या ७,५०,००० होती, ती मार्च १९७२ मध्ये २०,००,००० झाली.

## कापड गिरण्यांची यंत्रसामग्री निर्यात करण्यास वाव

जगातील देशांत कापडाची निर्यात करणारा भारत हा एक मोठा देश आहे. देशाला परदेशीय चलन मिळवून देण्याच्या कामी हा धंदा चांगले काम करीत आहे. तरीही परदेशीय चलनाची अधिक प्राप्ती होण्यासाठी नव्या बाजारपेठांचा शोध घेणे आवश्यकच आहे. त्या दृष्टीने सतत प्रयत्न करण्यात येत असतात. अलीकडे कापड गिरण्यांची यंत्रसामग्री निर्यात करण्यासाठी कोणत्या देशांत वाव आहे हे पाहण्यासाठी एक व्यापारी मंडळ परदेशांत पाठविण्यात आले होते. मंडळाने आपल्या दौऱ्यात तैवान, फिलिपाइन्स बेटे आणि इंडोनेशिया ह्या देशांना भेटी दिल्या. त्या वेळी मंडळाला असे आढळून आले की वरील देशांना कापड-गिरण्यांची यंत्रसामग्री व तत्संबंधी इतर माल अधिक प्रमाणात निर्यात करता येण्यासारखा आहे. ह्या तिन्ही देशांनी आपआपल्या कापडधंद्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याच्या योजना आखल्या आहेत. त्यामुळे कापड गिरण्यांच्या यंत्रसामग्रीच्या निर्यातीला नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अर्थात त्यासाठी ह्या देशांच्या आयात धोरणाच्या चौकटीत प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. ह्या देशांना ज्या प्रकारची यंत्रसामग्री पाहिजे ती ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पुरविण्यात आली पाहिजे. त्याचप्रमाणे देण्याघेण्याची व्यवस्थाही त्यांच्या आयात धोरणात बसेल अशी करावयास पाहिजे. भारतामधील निर्यात व्यापाऱ्यांनी त्या त्या देशांतील स्थानिक एजंटस् आणि संघटना ह्यांचे सहकार्य मिळविले तर निर्यातीच्या बाबतीत फलप्रद घटना घडून घेण्याची शक्यता आहे. तैवान देशाने पुढील दोन वर्षांत कृत्रिम धागे तयार करण्याचा उद्योगधंदा मोठ्या प्रमाणावर स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री भारताला पुरविता येण्यासारखी आहे.

---

## नागार्जुनसागर धरण काठोकाठ भरले

आंध्र प्रदेशातील नागार्जुनसागर यंदाच्या पावसाने काठोकाठ भरला आहे. ह्या धरणाला पाणी अडविण्याचे मोठमोठे दरवाजे आहेत, त्यांपैकी २६ दरवाजे आता बंद करण्यात आले आहेत. म्हणजे त्यांची उघडझाप करण्याची तांत्रिक व्यवस्था पूर्ण झाली आहे. हे धरण दगडी धरणांत जगातील सर्वांत उंच आणि मोठे आहे. त्याच्या विशालकाय भिंतीने कृष्णा नदीचे पाणी अडविण्यात आले आहे. नदीच्या पात्राच्या तळापासून पाण्याची उंची ३८० फूट इतकी झालेली आहे. एंजिनिअरांच्या भाषेत धरणात सुमारे ४०८ टी. एम. सी. पाणी साठविण्यात आलेले आहे. अडविलेल्या पाण्याचा विस्तार ११० मैल लांबीपर्यंत पसरलेला असून त्याचे टोक श्रीशैलमपर्यंत पोचलेले आहे. धरणाचे काम आता पूर्ण झालेले आहे. ह्या विस्तीर्ण जलाशयांतील पाण्याने २० लाख एकर जमिनीला पाण्याचा हमखास पुरवठा करण्याची सोय झाली आहे. देशांतील अन्नधान्याचे व नगदी पिकांचे उत्पादन वाढविण्यास ह्या धरणाचा फार मोठा उपयोग होणार आहे. धरणावर बसविण्यात आलेल्या दरवाज्यांपैकी तीन दरवाजे नुकतेच ५ फुटापर्यंत वरती घेण्यात आले, तेव्हा त्यामधून पाण्याचा प्रचंड लोंढा धरणाखालील कृष्णेच्या पात्रात पडू लागला. धरणातील जादा पाणी सोडण्यासाठी ते अंशत: उघडण्यात आले होते. धरणाच्या दोन्ही बाजूने काढण्यात आलेल्या कालव्यांतूनही आता पाणी सोडण्यात आले आहे धरणाचे भव्य काम पाहण्यासाठी दूरदूरहून शेकडो प्रवासी रोज येत असतात.

---

## मोटरगाडीने हजाराचे अडीच हजार रु. केले

चित्रपट निर्मात्याच्या एअरकंडिशन्ड कचेरीत एक तरुण अभिनेत्री आणि तिची आई गेली, तेव्हा त्यांना आपणच बोलावले होते हे त्या निर्मात्याच्या ध्यानात आले. त्या तरुणीला चित्रपटसृष्टीत प्रवेश करायचा होता आणि तिला एखाद्या बोलपटात छोटीशी भूमिका करायला संधी हवी होती. तिचा फोटो पाहून आणि ती नवीनच आहे हे लक्षात घेऊन, तिला मदत करण्याची निर्मात्याला इच्छा झाली. एका छोट्या भूमिकेसाठी तिला १,००० रु. देण्याचे त्याने ठरविले.

कचेरीत आल्यावर त्या तरुणीने एक विनंती केली, "माझ्या गाडीतून माझ्या सिगारेटस् आणायला आपण आपल्या नोकराला कृपा करून सांगता का?" असे म्हणत म्हणत तिने चित्रपट निर्मात्याच्या हाती आपल्या मोटरगाडीची किल्ली दिली. तिला १,००० रु. च फक्त देणे त्या निर्मात्याला आता बरे वाटेना; त्याने २,५०० रु. चा चेक लिहिला. तिला दिलेल्या भूमिकेची एवढी किंमत नव्हती, हे तो जाणून होता. पण तिच्या स्टेटस सिंबॉलचा, प्रतिष्ठेच्या प्रतीकाचा, मान त्याने राखला!

---

## किंमतींचा इंडेक्स नंबर वरवर चालला

औद्योगिक कामगारांचा अखिल भारतीय उपभोग्य जिनसांच्या किंमतींचा इंडेक्स नंबर जुलै, १९७३ च्या मानाने जुलै, १९७४ मध्ये २८·१% ने वाढला. गेले १७ महिने हा इंडेक्स नंबर (१९४९=१००) सारखा वाढतच आहे. जुलै, १९७४ मध्ये तो ३७८ झाला. जुलै, १९७२ च्या मानाने जुलै १९७३ मध्ये इंडेक्स नंबर १८·५% ने वाढला होता.

---

## "पैसे बुडाले; बरे झाले; कुणालातरी त्याचा उपयोग होईल"

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर ह्या अमेरिकन निग्रो प्राणिशास्त्रज्ञाने आपले पैसे अलबामा येथील बँकेत ठेवले होते, ती बँक बंद पडल्याचे वृत्त त्याला समजले. त्या बँकेत त्याचे ६ लक्ष रु. होते. कार्व्हर स्थितप्रज्ञ होता; पैसे बुडाल्याचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही. तो म्हणाला, "आता तरी त्या पैशांचा कुणालातरी काहीतरी उपयोग होईल. नाहीतरी मी स्वत: त्या पैशांचा उपयोग करीत नव्हतोच."

“ नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. ”

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth BELGAUM**

Invest in our “ Family Benefit Deposit Scheme ” and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*






'किर्लोस्कर पंप' हेच ना ? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी ? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रंदिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात. शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामेसुद्धा ते करीत असतात.

'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकार... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथायोग्य पंप. बरं, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.



किर्लोस्कर

किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.

● Registered users : Kirloskar Brothers Ltd.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)